

स्वाध्याय माला

# भारतीय सण व उत्सव

सौ. कुमुदिनी रांगणेकर

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय दा. वा.
दा.क्र. १५४९

BVBK-0401549

वाचनालय
वा.वा.
१५४९
१५।४८३

स्वाध्यायमाला : पुष्प २१३ वे

प्रथम विभाग

भारतीय सण व उत्सव

# अधिकमास

भा. सं. मं. ठाणें, वाचन-मय शाखा,
बाल वाङ्मय विभाग
वा. क्र. १५४९ दिनांक १५।

लेखिका

सौ. कुमुदिनी रांगणेकर,

मुंबई

विषय क्र. . . . . . . .

★

BVBK-0401549
BVBK-0401549

१–०० रुपया

[redacted]

अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे २.

सर्वाधिकार स्वरक्षित आवृत्ती पहिली

## संपादकीय

पूर्वी एकत्र कटुंबपद्धतीच्या काळात वर्षात येणाऱ्या सणा-उत्सवांची माहिती आजी अगर आजोबा ह्यांच्या तोंडून ऐकावयास मिळत असे. कित्येक वेळा त्यांतील काही उत्सव घरी साजरे केले जात व बाहेरच्या उत्सवासही मुले जात; त्यामुळे भारतीय संस्कृतीची व परंपरेची थोडी का होईना, मुलांना लहानपणीच माहिती मिळे. राम-कृष्णादिकांची प्रथम ओळख आई-वडिलांनी सांगितलेल्या गोष्टींपासूनच मुलांना पूर्वी होत असे. परंतु एकत्र कुटुंब-पद्धतीचा अभाव, पालकांचा उद्योग-व्यवसाय, उत्सवांचे सध्याचे घटते प्रमाण इ. मुळे तशी स्थिती राहिलेली नाही. छोटयाछोटया पुस्तिकांच्या वाचनाने ही ओळख मुलांना करून द्यावी या दृष्टीने आम्ही भारतीय सण व उत्सवां-संबंधी प्रत्येक महिन्याची एक अशा १२ व अधिकमासाची एक अशा १३ पुस्तिका आम्ही प्रकाशित करीत आहोत. सौ. रांगणेकर यांच्यासारख्या नावाजलेल्या लेखिकेने आत्मीयतेने सोप्या भाषेत थोडक्यात पुष्कळ माहिती दिली आहे. बालकांना वा प्रौढ साक्षरांना ही पुस्तके आवडतील असा आम्हांस भरवसा आहे.

### १. मालेतील पुस्तकांचा उपयोग :

(१) नवसाक्षर नागरिकालाही आवश्यक असे ज्ञान या पुस्तकांच्या वाचनाने मिळते.

(२) कॉलेज, हायस्कूल, ट्रेनिंग कॉलेजे यांमधील विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासाच्या विषयांस पूरक अशी माहिती या पुस्तकात दिलेली आहे.

(३) घरांतील खाजगी ग्रंथालये, संघ, दल या संस्थांची वाचनालये व प्रौढांचे शिक्षणवर्ग यांसाठी.

(४) वाढदिवस, मुंज, विवाह या मंगलप्रसंगी देण्यासाठी; [शाळा, कॉलेजे अगर तत्सम संमेलनप्रसंगी पारितोषिक म्हणून.]

### २. पुस्तकांतील विषयांचे स्वरूप :

* सुसंस्कृत नागरिकास असे वाटत असते की, आपल्या सभोवतालच्या वस्तू (विमान, रेडिओ, विजेची शक्ती इ.), राजकारणातील चालू प्रश्न; थोर पूर्वजांची चरित्रें, निरनिराळ्या देशांचे स्वातंत्र्येतिहास यांची माहिती आपणास असावी. मालेसाठी विषय निवडताना वरील दृष्टी ठेविली आहे.
* शाळेत स्थूलमानाने ज्या विषयांचे शिक्षण होते त्या विषयांना पूरक व उपकारक अशी माहितीही या पुस्तकांतून असते.

·मनोरंजक पद्धतीने उपयुक्त विषयांचे ज्ञान, शाळा-कॉलेजांतील विद्यार्थ्यांना आणि स्त्री-पुरुष नागरिकांना घरबसल्या देणे हा मालेचा हेतू आहे.

वाचनालय शाखा.
दिनांक
क्र.
विषय

# अधिकमास

वर्षाचे बारा महिने असतात हा झाला नियम ! अधिकमास हा तेरावा महिना म्हणजे ह्या नियमाला अपवाद ! सुमारे पावणे तीन वर्षांच्या कालावधीनंतर अगदी तोलून मापून सांगावयाचे तर, ३२ महिने, १६ दिवस व ४ घटिका इतक्या काळानंतर–जे वर्ष येते ते तेरा महिन्यांचे असते आणि त्यातील ज्या महिन्यात सूर्यसंक्रांत नसते त्या महिन्याला अधिकमास म्हणतात.

## पुरुषोत्तममास किंवा धोंडा महिना

चैत्रापासून आश्विनापर्यंतच्या आठ मासांपैकी कोणताही एक महिना अधिकमास असू शकतो. पण मार्गशीर्ष, पौष, माघ व फाल्गुन हे कधी ‘ अधिक ’ होत नाहीत.

चैत्र, ज्येष्ठ व श्रावण हे मास बारा वर्षांतून एकदा अधिक होतात. अठरा वर्षांनी अधिक आषाढ आणि चोवीस वर्षांनी अधिक भाद्रपद येतो.

अधिकमासाला पुरुषोत्तम मास, मलमास अशीही नावे आहेत. प्राकृतात म्हणजे मराठीत त्याला धोंड किंवा धोंड्या महिना म्हणतात.

**कहाणी**

आता ऐका, ऐका ही अधिकमासाची कहाणी.

एकदा काय झाले, शौनकादी ऋषी सूताला म्हणाले, "संसाररूपी हा समुद्र तरून जाण्याचा एखादा साधा, सोपा उपाय आम्हाला सांग."

तेव्हा सूताने पुढील कहाणी सांगितली. तो म्हणाला, "त्रिभुवनात संचार करणारे नारदमुनी एकदा हिमालयाच्या जवळ असलेल्या बदरिकारण्यात पोचले. नर-नारायणऋषी तिथे तप करीत असलेले त्यांना आढळले. त्यावेळी नारदांनी विचारले, "आपण हे तप कोणत्या हेतूने करीत आहा? ह्या कलियुगात जो तो आपापल्या पापपुण्याचा धनी असतो. मग आपण हे तप कशासाठी आचरता?"

"नारदा," नारायणऋषी बोलले, "मी एका थोर ऋषीचे चिंतन करतो आहे. त्या ऋषीचे नाव पुरुषोत्तम! वर्षाच्या बारा महिन्यांचे बारा स्वामी असतात. पण आता तेरावा महिना येणार आहे. त्याचा स्वामी पुरुषोत्तम, म्हणून त्या महिन्याचे नाव पुरुषोत्तम मास."

"मला ह्या नव्या मासाची कहाणी ऐकवा" नारदाने म्हटले.

"ठीक!" नारायणऋषी सांगू लागले, "पूर्वी द्वापर युगात कौरवांनी लबाडीने फासे टाकून पांडवांना हरविले व त्यांना वनावासाला धाडले. तिथे श्रीकृष्ण पांडवांना भेटायला गेले आणि

त्यांनी ह्या प्रश्नाचे उत्तर असे दिले. श्रीकृष्ण तेव्हा म्हणाले, " एकदा अचानक अधिक महिना उत्पन्न झाला. त्याला कोणाचा आधार नाही म्हणून लोक त्याला मलमास म्हणून हिणवू लागले. मग तो वैकुंठात माझ्याकडे आला. युधिष्ठिरा, 'शुभकार्यात विधवेला मज्जाव असतो त्याप्रमाणे लोक मला टाळतात,' हे त्याचे शब्द मला टोचले व पटले, आणि मी त्याच्यासह गोलोकाला गेलो."

"गोलोक ? हा कुठला लोक ?" युधिष्ठिराने विचारले.



"स्वर्ग, मृत्यू व पाताळ ह्या तीन लोकांची नावे तुला ठाऊकच आहेत, ह्याखेरीज अंतरिक्षात आणखी तीन लोक आहेत. गोलोक, वैकुंठ लोक व शिवलोक. तर मी गोलोकात पुरुषोत्तमाकडे त्या कष्टी अधिकमासाला नेले. त्याची हकीकत ऐकल्यावर पुरुषोत्तम म्हणाला, "आधी मी तुझे नाव बदलतो. आजपासून तुझे नाव पुरुषोत्तममास आणि मी तुझा स्वामी ! जे तुझे पूजन करतील त्यांचे मनोरथ पूर्ण होतील ! माणसाचा आपल्या मुलापेक्षा नातवावर अधिक जीव असतो. तसा माझ्या भक्तापेक्षा ह्या पुरुषोत्तममासाच्या भक्ताबद्दल मला विशेष जिव्हाळा वाटणार ! पावणेतीन वर्षांनी येणाऱ्या ह्या मासात जे स्नान, दान, पूजा, जप करतील त्यांच्यावर मी प्रसन्न

होईन." — ऐकलेस युधिष्ठिरा, अशा रीतीने अधिकमास इतर महिन्यांपेक्षा अधिक समर्थ झाला ! अंगात चिकाटी असली, गुण असले व योग्य व्यक्तीचे पाठबळ मिळविले की असा रंकाचा राव होतो बरे !"

"आणि आम्ही रावाचे रंक होऊन वनवास भोगत आहो !" युधिष्ठिर हळहळला.

"बाबारे", श्रीकृष्ण म्हणाले, "त्याला तसेच कारण आहे. तुम्ही ह्या वनात आल्यानंतर दोन-तीन वेळा अधिक मास येऊन गेला पण तुम्ही त्याचे पूजन केले नाही. दैव फिरले की माणूस असा ध्यानभ्रष्ट होतो. ही पूर्वीच्या जन्माची करणी ! थांब, ह्या द्रौपदीच्या पूर्वजन्माची कथा आता मी सांगतो. म्हणजे ह्या जन्मीच्या अनेक दुःखद घटनांचा तुला उलगडा होईल."

**द्रौपदीच्या पूर्वजन्माची कथा**

"युधिष्ठिरा," श्रीकृष्ण सांगू लागले, "मागील जन्मी ही द्रौपदी मेधावी नावाच्या ब्राह्मणाची मुलगी होती. तिला जन्म देऊन तिची आई वारली, काही वर्षांनी बाप वारला. ही पोरकी मुलगी फार बुद्धिमती होती. पण आता तिचे कशात लक्ष लागेना. फार उदास झाली ती. एक दिवस दुर्वास ऋषी तिथे आले. तिची हकीकत ऐकल्यावर त्यांनी म्हटले, "बाळे, आता लौकरच पुरुषोत्तम मास येणार आहे, त्यावेळी तू 'पुरुषोत्तम व्रत' कर म्हणजे तुला मनपसंत पती मिळेल !"

"वैशाख, कार्तिक, माघ ह्या मासांत व्रते करतात. त्या हलक्या अधिकमासात व्रत कशासाठी करायचे ?" तिने विचारले.

तसे तापट दुर्वास ऋषी चिडले. " ह्या जन्मी किंवा पुढल्या जन्मी तुला प्रायश्चित्त भोगावे लागेल, तू पवित्र पुरुषोत्तम-मासाचा अपमान केलास, " असे ते रागाने बोलले.

बापडी ब्राह्मणकन्या फार खिन्न झाली. तिने मग शंकराची तपश्चर्या केली. श्रीशंकर प्रसन्न झाले व त्यांनी तिला वर मागण्यास सांगितले. विलक्षण आनंद होऊन ती आवेशाने म्हणाली, " देवा, मला पती दे, पती दे, पती दे, पती दे, पती दे. "

श्रीशंकर बोलले, " तथास्तु ! पण मुली, 'पती दे' हे शब्द तू पाच वेळा उच्चारलेस तेव्हा तुला पाच पती मिळतील ! "

ब्राह्मणकन्या सुन्न झाली ! काय हे ! एका पत्नीला पाच पती ? " देवा, " ती म्हणाली, " असला लाजिरवाणा वर का दिलात मला ? "


" बाळे, तू पवित्र पुरुषोत्तम मासाची निंदा केलीस त्याचा हा परिणाम ! पण पुढील जन्मी त्याचे चांगले फळ मिळेल बरे तुला ! "

श्रीशंकराचे हे शब्द ऐकून ती आणखीच घाबरली. रात्रं-दिवस ती खेद करू लागली आणि त्यातच मरण पावली. पुढे द्रुपद राजाच्या यज्ञकुंडातून ती पुनः जन्माला आली. तिला द्रौपदी हे नाव मिळाले आणि पूर्वजन्मीच्या वरानुसार पाच पती लाभले ! ऐकलेस युधिष्ठिरा, पुरुषोत्तम मासाचा हा असा महिमा आहे. तेव्हा येत्या पुरुषोत्तम मासात तुम्ही स्नान, दान, जप इत्यादी करा; म्हणजे वनवासातले हे चौदावे वर्ष संपताच तुमचा भोग सरेल ! मी तुमचा पाठीराखा आहेच. पण मी तुमचा पक्षपात करतो असे कोणी म्हणू नये ह्यासाठी तुम्ही 'पुरुषोत्तमव्रत' करा. म्हणजे मी तुमच्या शत्रूंचा चुटकीसरसा संहार करीन.

मग योग्य वेळी पुरुषोत्तममास आला. पांडवांनी व्रत केले आणि त्यामुळे त्यांच्या शत्रूंचा नाश झाला. त्यांना त्यांचे राज्य लाभले.

**गोप्रदान**

पुरुषोत्तमव्रत आचरावयाचे म्हणजे नेमके काय करावयाचे ? वाल्मीकी ऋषींनी ह्याची फोड केली आहे.



"एकदा लक्ष्मी श्रीविष्णूला म्हणाली," वाल्मीकी सांगू लागले, "आपल्या आवडत्या पुरुषोत्तममासात कुणाची पूजा करावी, कसली दाने द्यावी, कोणती व्रते आचरावी हे मला सांगता काय ?"

"ऐक." श्रीविष्णू बोलले, "ह्या मासात अनेक वस्तूंचा किंवा सवयींचा त्याग करण्याचे व्रत धरावे. 'अपूप' ऊर्फ अनारसे ह्या खाद्य पदार्थाचे व इतर अपूर्वाईच्या पदार्थांचे दान करावे. कोणी दीपदान करतात. कोणी सवत्स गोप्रदान करतात. गाईवासराचे दान. कोणी धात्रीस्नानाचा नेम धरतात. आवळ्याचा कल्क अंगाला लावून केलेल्या आंघोळीला धात्रीस्नान म्हणतात."

"उपवासाबद्दल कोणते नेम सांगितले आहेत ?" लक्ष्मीने प्रश्न केला.

"ज्याला सोसेल त्याने महिनाभर उपवास करावा. नाहीतर एक दिवसाआड जेवण्याचा नेम धरावा. कोणी एक वेळ जेऊन रहातात. कोणी मौन भोजन करतात. जेवणाचे वेळी न बोलण्याचे हे व्रत मोठे उत्तम ! त्यामुळे पुढ्यात अन्नब्रह्म असल्यावेळी तरी तोंडाने अन्नाची निंदा केली जात नाही !" श्रीविष्णू म्हणाले.

"आणि गोप्रदानाला एवढे महत्त्व कशासाठी ?" लक्ष्मीने विचारले.

"वा: ! अग, त्रिभुवनांत गाईएवढे थोर दैवत दुसरे नाही बरे ! गोमातेच्या अंगाला स्पर्श केल्यास पापांचे भस्म होते. शेपटीस स्पर्श करताच दारिद्र्य, दुःख, रोग नाहीसे होतात. गाईचे शेण म्हणजे जणू यमुनेचे पवित्र पाणी. गोमूत्र म्हणजे नर्मदा नदी व गाईचे दूध म्हणजे गंगामाई. गाईच्या दही, दूध, तुपाने यज्ञकर्मे पार पडतात. ब्राह्मणाला पवित्र मानले जाते. पण गाय ब्राह्मणापेक्षाही पवित्र आहे ! असे पहा, गाईचे दूध म्हणजे प्रती अमृत ! पण तिचे शेण तरी टाकाऊ असते का ?—छे ! होमाची जागा त्या शेणाने सारवतात; त्यामुळे ती जागा पवित्र होते. गाईला

प्रदक्षिणा घातली की उभ्या पृथ्वीला प्रदक्षिणा घातल्याचे पुण्य मिळते ! अशा पवित्र गाईचे पुरुषोत्तम मासात दान करावे. मात्र हे दान सत्पात्र ब्राह्मणालाच करावे."

"मग सत्पात्र ब्राह्मणाची व्याख्या तरी सांगा;" लक्ष्मीने हसून म्हटले.

"ऐक तर–जो सदोदित सत्य बोलतो, जो तपस्वी, दयाळू व निर्लोभी असतो, जो स्वधर्माने वागतो, न्यायाने आपल्या कुटुंबाचे पोषण करतो व जो रात्रंदिवस ईश्वराचे स्मरण करतो अशा सात्त्विक ब्राह्मणाला सत्पात्र समजावे. अशा विद्वान, सत्पात्र ब्राह्मणाची पूजा करावी, त्याला दान द्यावे. म्हणजे ह्या लोकी सुख, ऐश्वर्य व परलोकी स्वर्ग लाभेल ! मात्र सत्पात्र ब्राह्मण रागीट असतो बरे. त्याचा अपमान झाला तर त्याच्या क्रोधाला बळी पडण्याची वेळ येते !"

"पण नकळत असा अपराध घडला तर ?" लक्ष्मीने प्रश्न केला.

"विस्तवावर नकळत पाय पडला तरी भाजतो ना ? तसेच आहे हे !" श्रीविष्णूनी सांगितले.

"समजले ! आता दीपदानाबद्दल विचारू का ? त्यामुळे कोणते फल प्राप्त होते ? दीपाला तेल कसले घालावे ? वाती किती घ्याव्या ? दीप किती दिवस पाजळावा ?–ह्याबद्दल नियम असतील ना ?" लक्ष्मीने विचारले.

"बापरे ! किती प्रश्न हे ! आता ऐक त्यांची उत्तरे. लक्ष्मी, अधिकमासात शुक्ल प्रतिपदेपासून अमावास्येपर्यंत तांब्याचा

दीप अखंड तेवत ठेवावा. त्यात पाच अंगुळे लांबीची सात तंतूंची वात घालावी व ती तुपात किंवा तेलात भिजवून पेटवावी. महिनाभर हा दीप पाजळावा, पुजावा आणि अमावास्येच्या दिवशी सत्पात्र ब्राह्मणाला जेऊ घालावे आणि त्याला दीपदान करावे. त्यामुळे पुण्य लाभते. लक्ष्मी, ह्या पुण्याचा विशेष हा की, ते दुसऱ्याला देऊन त्याचा उद्धार करता येतो," श्रीविष्णूंनी सांगितले.

"खरे ?– मग ह्याविषयीची कथा सांगा ना मला," लक्ष्मी म्हणाली.

"एक–" श्रीविष्णू सांगू लागले, "इंद्रलोकी स्मितविलासिनी नावाची एक अप्सरा होती. ती एकदा आपल्या मैत्रिणींसह पृथ्वीवर कुरुक्षेत्रात आली. तिथली सुगंधी फुले वेचून तिने हार गुंफला. पण तो कोणाच्या गळ्यात घालायचा ? एवढ्यात दुर्वास ऋषी तिथे आले. त्या वेड्या अप्सरेने तो हार सरळ त्यांच्या गळ्यात घातला."

"अग्गबाई ! मग ? आधीच ऋषी तापट. त्यात त्या खुळीने भलतेच केलेले ! पुढे काय झाले ? सांगा ना." लक्ष्मीने उत्सुकतेने म्हटले.

"दुसरे काय होणार ? दुर्वासांनी तिला शाप दिला की तू पिशाच्च होऊन पृथ्वीवर भटकत रहा. तशी स्मितविलासिनी घाबरली. तिने दुर्वासांचे पाय धरून क्षमा मागितली तेव्हा त्यांनी उःशाप–शापाची तीव्रता कमी करणारा पर्याय–सांगितला. ते म्हणाले, "दक्षिण दिशेला कुमारी नावाचे क्षेत्र आहे. काही वर्षांनंतर याज्ञवल्क्य कुळातली एक स्त्री तप करण्यासाठी तिथे येईल.

हृया तपकाळात अधिक मास आला की ती उपवास, दीपपूजन वगैरे करील. अमावास्येदिवशी तू अचूक तिथे जाशील. तिला



त्या वेडया अप्सरेने तो हार ऋषीच्या गळयात घातला.

भक्षण करावे असे तुला वाटले तरी तिच्या तपाच्या तेजामुळे तुला गेल्या जन्माचे स्मरण होईल. तू तिला शरण जाशील आणि अधिकमासातील दीपदानाचे पुण्य तुला देऊन ती तुझी शापापासून मुक्तता करील." आणि तसेच सगळे घडून आले. अधिकमासातील दीपदानाचे आपले पुण्य त्या अप्सरेला देऊन त्या तापसीने तिचा उद्धार केला–" श्रीविष्णूंनी सांगितले.


## नकळत घडलेले पुण्य

"ऐकलेस ना नारदा," नारायणऋषी म्हणाले, "वाल्मीकीने अशा रीतीने पुरुषोत्तमव्रताची माहिती स्पष्ट केली. आता तुला शेवटची–वानराच्या मोक्षप्राप्तीची– कथा सांगतो ती ऐक. पूर्वी कदर्य नावाचा एक कंजूष ब्राह्मण होता. तो दुसऱ्याला तर काही देत नसेच, पण आपल्या जिवालाही भोगत नसे. एकदा एका फळबागेच्या मालकाने त्याला राखणदाराची नौकरी दिली. कदर्य बागेतली फळे चोरून विकी व आलेला पैसा जमिनीत पुरून ठेवी. मालकाने विचारले तर पक्षी येऊन फळे खातात असे खोटे सांगत असे."

ह्या पापामुळे मृत्यूनंतर त्याला वानराचा जन्म मिळाला. मृगतीर्थ नावाच्या सरोवराच्या काठी तो राहू लागला.

एकदा चित्रकुंडल नावाच्या एका श्रीमंत वैश्याने अधिकमासानिमित्त पुरुषोत्तम व्रत केले होते. उद्यापनाच्या वेळी त्याने अनेक ब्राह्मणांना बोलावले होते. त्यांत पूर्वजन्मीचा कदर्य ब्राह्मण होता. त्याने अनायासे पुरुषोत्तमाची पूजा पाहिली, नैवेद्य चाखला, आणि दक्षिणेच्या लोभाने अधिकमासाची तोंड भरून स्तुतीही केली. आदल्या जन्मीचे हे पुण्य फळाला आले आणि पापामुळे मिळणारा पुढला वानर जन्म त्याला मृगतीर्थ ह्या पवित्र स्थानी लाभला. शिवाय, त्रेतायुगात वानरांनी श्रीरामचंद्राला खूप सहाय्य केले होते. त्यामुळे जिथे वानरे राहातील तेथील नद्या, तळी, सरोवरे पाण्याने भरलेली असतील असा वर श्रीरामाने दिला होता. तेव्हा हा वानर मजेत पोटभर खाऊ, पिऊ शकला असता, पण गेल्या जन्मीच्या पापामुळे जन्मापासून त्याच्या माकडतोंडाला व्रण झाला होता. तिथे खूप फळे असूनही त्याला ती खाता येत

नव्हती. ‘ देव देतो आणि कर्म नेते ’ ते असे ! अशा अवस्थेत एका झाडावरून दुसऱ्या झाडावर उडी मारीत असता वानर मृगतीर्थाच्या कुंडात पडला. ती अधिकमासातली कृष्ण दशमी होती. पुढे पाचव्या दिवशी तो कुंडातच मरण पावला. पण अधिकमासात त्याला नकळत उपवास आणि तीर्थात स्नान घडल्यामुळे तो



विमानातून वैकुंठाला गेला ! नारदा, अधिकमासात नकळत घडलेले पुण्यसुद्धा असे फळते. मग यथाविधी स्नान, दान, उपवास इत्यादी केले तर केवढे पुण्य लागेल बरे ? ”

सूत शौनकादी ऋषींना म्हणाला, “ नारायणऋषीचे हे एकंदर विवेचन ऐकून नारद मुनीला मोठे समाधान वाटले. मग नारदाने मृत्युलोकात जाऊन ही कहाणी अनेकांना सांगितली. अनेक लोकांनी त्यायोगाने स्वतःचे कल्याण करून घेतले. ”

अशी आहे अधिकमासाची कहाणी. ह्या मासात दान का करावयाचे ? ' दिल्याशिवाय मिळत नाही, पेरल्याशिवाय उगवत नाही ' हा निसर्गाचा नियम आहे. मात्र फक्त श्रीमंतांनीच नव्हे तर गरिबांनीसुद्धा थोडा तरी दानधर्म करावा. तो गेल्या जन्मी न केल्यामुळे ह्या जन्मी आपण निर्धन झालो हे त्यांनी लक्षात ठेवावे.

सत्पात्र ब्राह्मणालाच दान द्यावे. पण असा ब्राह्मण मिळाला नाही तर ? अशा वेळी सत्पात्र ब्राह्मणाला उद्देशून उदक सोडावे. एखाद्या वेळी असे होते की, आपल्याला योग्य वाटलेला ब्राह्मण दान घेऊ इच्छित नसतो. अशा प्रसंगीसुद्धा त्याला उद्देशून उदक-पाणी सोडावे.

**मौनभोजन**— हे व्रत सोपे आहे, पुण्यदायक आहे. परंतु मौनभोजनाच्या वेळी देवाचे नामस्मरण अवश्य करावे.

एकनाथी भागवतात एकनाथ महाराजांनी सांगितले आहे की, ' रामनामाचे जे स्मरण । या नाव गा महामौन ।। '

**त्याग** — अधिक मासात महिनाभर आपल्या आवडत्या वस्तूचा त्याग करणे हेसुद्धा एक पुण्यदायक व्रत आहे. महिन्याच्या शेवटी त्याग केलेल्या वस्तूचे सत्पात्र ब्राह्मणाला दान द्यावे व मग आपण तिचे सेवन करावे. मात्र आपल्याला विशेष आवडणाऱ्या वस्तूचा त्याग करायला हवा. नको असलेल्या वस्तूचा त्याग कोणीही करील. तो खरा त्याग नव्हेच.

कोणतेही व्रत करताना थोडी तरी शारीरिक किंवा मानसिक झीज सोसायला हवी – म्हणजेच चीज होते !

वरील व्रतांपैकी – वित्तदान, दीपदान, अन्नदान, उपवास मौनभोजन, त्याग ह्यापैकी – आपल्या प्रकृतीला व परिस्थितीला पचतील, रुचतील अशी व्रते अधिकमासात प्रत्येकाने करावीत.

असल्या व्रतांवर श्रद्धा नसणाऱ्यांनीसुद्धा करावी. निदान त्यामुळे महिनाभर मनाला व शरीराला बंधने जडवून घेण्याची सवय झाली तर तीदेखील फायदेशीर ठरेल! संयम–मनावर व शरीरावर ताबा ठेवणे–नेहमीच हितकारक आहे! तेव्हा प्रत्येकाने अवश्य ह्यातले एखादे सोपेसे व्रत तरी करावेच. कदाचित त्याचा चांगला परिणाम घडून आला तर श्रद्धेचा अश्रद्धेवर विजय होईल!

पाचा उत्तरांची ही अधिकमासाची कहाणी।
साठा उत्तरी सफळ संपूर्ण ॥

## भारतातील अन्य धर्म

आपल्या भारतातील हिंदू धर्माखेरीज बुद्ध व जैन ह्या दोन धर्मांची माहिती बुद्धजयंती व महावीर जयंतीच्या निमित्ताने मिळाली आहे. आता भारतातील अन्य धर्मांसंबंधी, त्यांच्या सणा-उत्सवांसंबंधी माहिती थोडक्यात पाहू या.

कालमानाप्रमाणे बघितले तर ह्या इतर धर्मांत पारशी धर्म सर्वांत जुना आहे म्हणून प्रथम तो घेऊ.

### पारशी धर्म

इराणमधील पार्स प्रांतात ख्रिस्ती शतकापूर्वी अडीच, तीन हजार वर्षे पारशी धर्म अस्तित्वात होता. पण त्या काळी जादूटोणा व अंध विश्वास माजला होता. पुढे इ. स. पूर्वी ६६० साली पारशी धर्माचा खरा संस्थापक झरतुष्ट्र ह्याचा जन्म झाला. झरतुष्ट्राने अनेक जुन्या, अयोग्य कल्पना काढून टाकल्या. पारशांचा मुख्य धर्मग्रंथ ‘अवेस्ता’ हा फार प्राचीन आहे. झरतुष्ट्राने हे अवेस्ता-वाङ्मय व्यवस्थित तयार केले.

पारशी लोक अग्निपूजक आहेत. आपल्या अग्यारीत—देऊळात—ते अग्नीची पूजा करतात. पारशी धर्माप्रमाणे आत्मा अमर आहे.



## नवजोत

नवजोत हे पारशांचे मुख्य व्रत आहे. हे व्रत वयाच्या सातव्या वर्षांपासून पंधराव्या वर्षापर्यंतच्या काळांत करण्यात येते. आपणाकडील मौंजीबंधन ऊर्फ मुंजीसारखा प्रकार आहे हा. फरक इतकाच की, हा विधी मुलगे व मुली या दोघांसाठी रूढ आहे. या व्रतानुसार पारशी बूट, सदरा व कस्ती धारण करतो. कस्ती हा बहात्तर पदरी धागा असतो. या कस्तीला पुढे दोन व मागे चार गाठी असतात. कमरेभोवती तीन वळसे देऊन ही कस्ती बांधतात. नवजोत झाली की बटूला सर्व प्रकारचे धार्मिक विधी करण्याचा अधिकार प्राप्त होतो.

सण

पारशी लोकांचे महत्त्वाचे सण पुढीलप्रमाणे आहेत. नवरोज, पटेटी, खोर्दाद साल, मुक्ताद इत्यादी.

नवरोज हा पारशी लोकांचा नवीन वर्षाचा आरंभ ! जगाची उत्पत्ती झाल्याची आठवण म्हणून ते पटेटीचा सण साजरा करतात.

खोर्दाद साल हा झरतुष्ट्राचा जन्मदिन मानण्यात येतो. ह्या सर्व सणांच्या दिवशी पारशी लोक दारापुढे रांगोळी घालतात, दाराला तोरणे लावतात. लग्नाकार्यात आणि इतर मंगल प्रसंगी कपाळाला कुंकू लावण्याचा प्रघात ह्या लोकांत आहे.

म्हणजे आपले आणि पारशी लोकांचे पूर्वज आर्य लोकच होते असा तर्क करणे ह्यामुळे योग्य ठरते. पारशी व आर्य लोकांच्या धर्मकल्पनांमध्ये साम्य आढळते. 'अवेस्ता' ह्या पारशी धर्मग्रंथाची झेंद भाषा वेदातील संस्कृत भाषेशी जुळणारी आहे.

जगात एकच देव आहे असे पारशी लोक मानतात. त्यांच्या अग्निमंदिरातील अग्नीची व्यवस्था पाहाण्यासाठी धर्मगुरू नेमलेले असतात. त्यांना दस्तुर असे म्हणतात.

समाजाची व्यवस्था नीट चालावी म्हणून जातपंचायत असते. ह्या पंचायतीमध्ये धर्मगुरू आणि जातीतले जाणते, मोठे लोक यांचा समावेश केलेला असतो.

पारशी लोक मृताला जाळीत नाहीत, अगर पुरतही नाहीत. निवांत ठिकाणी 'दोखमा' ह्या नावाची विहिरीसारखी खूप खोल जागा तयार केलेली असते. प्रेतांना तिथे ठेवतात आणि गिधाडां-कडून ती खाल्ली जातील अशी व्यवस्था करतात.

पारशी लोकांचा नूतन वर्षारंभ सप्टेंबर महिन्यापासून सुरू होतो. आपल्याकडे भाद्रपद महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्याला पितृपक्ष म्हणतात आणि ह्या पंधरा दिवसांत श्राद्धे घालण्यात येतात. त्याचप्रमाणे पारशी लोकांच्या शेवटल्या महिन्यातील शेवटल्या दिवसांना ते श्राद्धदिन मानतात आणि श्राद्धविधीला ते मुक्ताद असे म्हणतात.

आपल्याप्रमाणेच त्यांचे वर्ष बारा महिन्यांचे आहे. पण प्रत्येक महिना ते तीस दिवसांचा धरतात. त्यामुळे वर्षाचे तीनशे साठ दिवस होतात. सौर कालगणनेनुसार वर्षाचे तीनशे पासष्ट दिवस असतात. ही भरपाई करण्यासाठी ते लोक वर्षाच्या शेवटी पाच दिवस राखून ठेवतात. त्यांना गाथा हे नाव आहे. हा गाथा संपल्यावर सहाव्या दिवशी पटेटीचा सण येतो.

सणावारी पारशी स्त्रीपुरुष उत्तम कपडे घालून फिरायला जातात. स्नेही मंडळींना भेटी देतात. एकत्र जमून प्रार्थना, जेवण, दानधर्म करण्याची त्यांची जुनी रीत आहे.

पारशी लोक मोठे दानशूर असतात. जे. जे. हॉस्पिटल, टाटा कॅन्सर हॉस्पिटल, टाटा रिसर्च इन्स्टिटयूट वगैरे कितीतरी लोकोपयोगी संस्था पारशी लोकांनी स्थापन केल्या आहेत.

दादाभाई नवरोजी, फिरोजशहा मेथा ह्या पारशी गृहस्थांनी भारताच्या राजकारणाला हातभार लावला. पारशी लोक मूळ इराणातले असले तरी आज ते हिंदुस्थानालाच मातृभूमी समजतात. त्यांच्या कर्तृत्वाची संपत्तीची हिंदुस्थानाच्या उद्योगधंद्याला खूप मदत झाली आहे.

इराणमधून येथे आल्यावर अनेक वर्षे पारशी लोक संजाण बंदरात रहात होते. तेथे ते शेतीचा व्यवसाय करीत असत. पुढे

त्यांची लोकसंख्या वाढू लागली. त्यामुळे केवळ शेतीवर उदरनिर्वाह करणे त्यांना अशक्य झाले. तेव्हा बरेच लोक खंबायत, सुरत, अंक्लेश्वर, ठाणे इत्यादी ठिकाणी पांगले.

इ. स. १४९० साली मुसलमानांनी संजाण बंदर जिंकल्यावर पारशी लोकांनी आपला पवित्र अग्नी नवसारी, बलसाड व उदवाडा ह्या गावांत आणून ठेवला.

इ. स. १६७१ च्या सुमारास हे लोक मुंबईस आले व त्यांनी व्यापारास सुरुवात केली. येथून चीन, ब्रह्मदेश व अरबस्तान इत्यादी देशांत ते व्यापारासाठी जात असत, त्यांनी व्यापारात उत्तम आघाडी मारली. ते चांगले श्रीमंत झाले. त्यांच्यामध्ये शिक्षणाचा व सुधारणांचा प्रसार फारच झपाट्याने झाला.

पारशी धर्मानंतर अस्तित्वात आलेल्या ज्यू, ख्रिस्ती आणि इस्लामी धर्मांवर ह्या धर्माची छाप पडलेली आहे असे विद्वान लोक म्हणतात.

पारशी धर्माचा संस्थापक झरतुष्ट्र हा फार साधा, प्रेमळ माणूस होता. आपल्या व्यासमुनींनी महाभारताची नीट रचना केली. झरतुष्ट्राने त्यांच्या 'अवेस्ता' ग्रंथाला असेच नेटके रूप दिले. तो पारशी लोकांचा 'व्यास' होता असे म्हणावयास हरकत नाही. जवळजवळ पन्नास वर्षे झरतुष्ट्राने नव्या पारशी धर्माचा प्रसार केला. जुनाट मतांच्या धर्मोपदेशकांनी त्याला फार त्रास दिला, आणि एकदा झरतुष्ट्र बाल्क शहरातल्या मंदिरात अग्नीची उपासना करीत असताना रानटी तुराणी लोकांनी अचानक हल्ला केला. सर्वांची कत्तल केली त्यांनी.

अशा रीतीने विनम्र व सरळ स्वभावाच्या झरतुष्ट्राला वयाच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी धर्मवीराचे मरण आले.

पुढे स्थापन झालेल्या ख्रिस्ती धर्माचा संस्थापक येशू ख्रिस्त ह्यालासुद्धा यहुदी अधिकाऱ्यांनी अशाच रीतीने अकाली मारले. ह्या दोन धर्मांत हे मोठे साम्य आहे.

## ख्रिस्ती धर्म

येशू ख्रिस्त हा ख्रिस्ती धर्माचा संस्थापक. इसवी सनापूर्वी चौथ्या वर्षी बेथ्लेहेम गावी २४ डिसेंबर रोजी, मध्यरात्री त्याचा जन्म झाला. कुमारी मेरी ही त्याची आई. ती यहुदी होती.

त्या काळी ज्यू धर्माचे वर्चस्व होते. येशू ख्रिस्ताने ज्यू धर्म आणि मोझसेचे कायदे समजावून घेतले. मोझसेचे कायदे म्हणजे टेन कमांडमेंटस्! ह्यावर सुंदर इंग्रजी बोलपट निघाला होता.

येशू आदर्श धर्मोपदेशक होता. एकांतस्थानी बसून तो मिळविलेल्या ज्ञानाचे मनन करीत असे. धर्मस्थापना करण्यासाठी आपला अवतार झाला आहे, आपण ईश्वराचे पुत्र आहो असा साक्षात्कार त्याला झाला होता. हस्तस्पर्शाने रोग बरे करण्याची सिद्धी येशूला प्राप्त झाली होती.

डिसेंबर चोवीसपासून एक जानेवारीपर्यंत नाताळचा सण साजरा केला जातो. या दिवसांत ख्रिस्ती लोक दररोज आपल्या देउळात—चर्चमध्ये—जाऊन देवाची प्रार्थना करतात. मित्रमंडळींना भेटून शुभसंदेश देतात, भेटकार्डे पाठवितात. घरोघरी मेजवान्या होतात. 'नाताळ केक' हा त्यातील महत्त्वाचा पदार्थ मानला जातो. २४ डिसेंबर हा ह्या सणातला मुख्य दिवस. त्या दिवशी ख्रिस्ती लोक आपल्या घरात 'नाताळचे झाड' आणतात. त्याला पताका लावतात, खेळणी टांगतात. ठिकठिकाणी मेणबत्त्या पेटवितात लहान मुले ह्या झाडाभोवती फेर धरून नाचतात, गातात.

मध्यरात्री घरातला पोक्त इसम—बहुधा बाप—सँटा क्लॉज ऊर्फ नाताळ पित्याचे सोंग घेतो. खोटी दाढी लावून गोंड्याची टोपी



घालतो तो. जमलेली पाहुणे मंडळी त्याला नाना प्रश्न विचारतात. तो मजेशीर उत्तर देतो आणि खूप गंमत होते. घरातली मुले झोपी गेल्यावर हा नाताळ पिता चोर पावलांनी त्यांच्या खोलीत जातो. मुलांनी आपल्या पलंगाला पायमोजे टांगलेले असतात. त्यांमध्ये खेळणी भरतो तो. सकाळी उठताक्षणी मुलांना सानंदाश्चर्याचा गोड धक्का बसतो.

त्यानंतर ईस्टर हा महत्त्वाचा चार दिवसांचा काळ. त्याला सण म्हणता येणार नाही. येशू ख्रिस्ताची पुण्यतिथी आहे ही. नाताळ ही त्याची जयंती. मोठ्या आनंदाचा सोहळा. पण ईस्टर हा शोकाचा काळ आहे.

ज्यू धर्माचे आचार्य पंडिती थाटाने जे अवघड तत्त्वज्ञान सांगत असत ते येशूने सोप्या शब्दांत सांगितले. साहजिकच लोकांना ते कळले, आवडले. पण हे ज्यू धर्माचार्य त्यामुळे चिडले. त्यांनी यहुदी अधिकाऱ्यांकडे तक्रारी नेल्या आणि बंडखोर येशूला फाशीची शिक्षा देण्यात आली. त्यावेळी तो अवघा तेवीस वर्षांचा होता.

ईस्टरच्या चार महत्त्वाच्या दिवसांपैकी पहिला दिवस म्हणजे 'गुड फ्रायडे'! ह्या शुक्रवारी येशूला फाशी देण्यात आलें होते. चौथ्या दिवशी, ईस्टरच्या सोमवारी, येशूचे पुनरुत्थापन झाले. ज्या थडग्यात त्याचे प्रेत ठेवले होते ते रिकामे आढळले. साहजिकच ह्या चमत्कारामुळे लोकांना येशूची किंमत कळून आली. त्याने केलेल्या उपदेशाला महत्त्व चढले.

'बायबल' हा ख्रिस्ती लोकांचा धर्मग्रंथ. त्याचे दोन भाग आहेत. एका भागाला 'जुना करार' म्हणतात. तो यहुदी धर्माला मान्य असून मूळ हिब्रू भाषेत लिहिला आहे. दुसऱ्या भागाला 'नवा करार' म्हणतात. त्यामध्ये येशू ख्रिस्त, त्याचा उपदेश ह्याविषयी सत्तावीस प्रकरणांतून संपूर्ण माहिती इंग्रजीतून दिली आहे.

येशूने केलेल्या उपदेशात गिरिप्रवचन फार प्रसिद्ध आहे. येशू स्वतः ब्रह्मचारी होता. पण धार्मिक व्यक्तीने समाजापासून दूर रहाण्यापेक्षा समाजाची सेवा करावी असे तो शिकवीत असे.

'फुलामुलांचे' कवी म्हणून प्रसिद्ध असलेले रेव्हरंड टिळक ख्रिस्ती धर्मातल्या ह्या व अशा तत्त्वांनी भारावून गेले आणि म्हणून त्यांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला.

'ही खरी प्रभुसेवा–जनसेवा । मान्य खरोखर देवा ।' असे टिळकांनी वर्णन केले आहे. ख्रिस्ती धर्माचे मर्म ह्यात आढळते. ख्रिस्ती धर्मात ममतेला व क्षमेला फार मोठे स्थान आहे.

एकदा लोकांचा जमाव एका बाईवर दगडफेक करताना येशू ख्रिस्ताला दिसला. त्याने चौकशी केल्यानंतर कळले की, ती बाई पापी असल्यामुळे लोक तिचा असा जाहीर धिक्कार करीत होते. त्यावर येशूने मोठे मार्मिक उत्तर दिले. तो म्हणाला, "तुम्हांपैकी ज्याच्या हातून कधीच वाणीने, मनाने किंवा शरीराने पाप घडले नसेल त्यानेच ह्या बाईला दगड मारावा." अर्थातच सर्वांच्या हातांतले दगड गळून पडले. कारण माणूस म्हटला की, त्याच्या हातून लहान, मोठे पाप कधी ना कधी घडतेच.



ह्यापेक्षासुद्धा अजब घटना पुढे घडली. येशू मानवतेचा महान उपासक असूनही त्याला विलक्षण छळ सहन करावा

लागला. त्याला क्रूसावर चढवून व हातापायांस खिळे ठोकून हाल-हाल करून ठार मारले. त्याच्या डोक्यावर काटयांचा मुकुट मुद्दाम घातला होता. तरी शेवटपर्यंत येशूच्या मनाची शांती ढळली नाही. मरणाच्या दारात भयंकर यातना भोगत असतानासुद्धा त्याने परमेश्वराला विनविले की, "परमेश्वरा, यांना ( मला मारणाऱ्यांना ) क्षमा कर. कारण आपण काय करीत आहोत हे त्यांना कळत नाही."

'लोका सांगे ब्रह्मज्ञान, आपण कोरडे पाषाण.' अशी येशूची रीत नव्हती. तो मूर्तिमंत शांततेचा पुतळा होता.

काही बाबतींत ख्रिस्ती धर्माचे बुद्ध धर्माशी साम्य आहे. गौतम बुद्धाने शिकविलेल्या साध्या, सोप्या धर्माशी येशूने शिक-विलेल्या धर्माचे साम्य आहे. खरे म्हणजे, सर्व धर्मांत थोडा फार सारखेपणा असतोच. मुळातली तत्त्वे बरीच सारखी असतात. पण कधी कधी ह्या चांगल्या तत्त्वांचा व्यवहारात वापर करताना स्वार्थामुळे माणसे ती बदलतात. आणि मग ह्या बदललेल्या तत्त्वांना मान्यता मिळते. साहजिकच धर्माचा निर्भेळपणा गढूळ होतो.

आज जगात ख्रिस्ती कालगणना सर्वत्र रूढ झाली आहे. येशू ख्रिस्ताच्या नामकरणापासून ह्या कालगणनेला आरंभ झाला. त्या पूर्वीच्या काळाला ख्रिस्तपूर्व असे म्हटले जाते.

पॅलेस्टाइन प्रांतातल्या बेथ्लेहेम गावी येशूचा जन्म झाला. यामुळे त्या गावाचे महत्त्व वाढले. 'पुष्पसंगे मातीस वास लागे' हे अगदी खरे आहे. येशू ख्रिस्ताचे अनेक शिष्य होते. पण त्यांतले बारा वेचक शिष्य होते. त्यांना येशूने शांती, क्षमा, दया, सेवा,

मानवता, बंधुभाव ह्यांचे धडे दिले होते. पण दुर्दैवाने ह्या बारा शिष्यांपैकी एक फितुर झाला, आणि त्याने येशू ख्रिस्ताला यहुदी अधिकाऱ्यांच्या स्वाधीन केले.

ख्रिस्ती धर्मात अनेक पंथ उपपंथ आहेत. काही पंथ फार कडक आहेत. काही तितके कट्टर नाहीत. काही स्त्रिया आजन्म अविवाहित राहून जनसेवेचे व्रत घेतात. अशा जोगिणींनी खूप समाजसेवा केली आहे, अजून करीत आहेत.

असा आहे ख्रिस्ती धर्म. आणि असा होता येशू ख्रिस्त- दलितांचा उद्धारक, शांतीचा प्रेरक, मानवतेचा उपासक, प्रेमाचा प्रसारक, दयेचा सागर आणि सेवेचा आगर !

## इस्लामी धर्म


अरबस्तानात मक्का ह्या गावी इ. स. ५७० मध्ये महंमद पैगंबराचा जन्म झाला.

त्या काळी अरबस्तानातील लोकांची स्थिती फार वाईट होती. त्यांना शिक्षणाचा किंवा संस्कृतीचा गंध नव्हता. ते पाहून महंमदाला वाईट वाटे. त्यातच त्याला देवाने साक्षात्कार दिला की, " तू माझा दूत आहेस. तू लोकांमध्ये इस्लामी धर्माचा प्रसार कर. " त्याप्रमाणे महमद लोकांना इस्लामी धर्म शिकवू लागला. पण अरबी लोक त्याची टिंगल उडवीत. शेवटी इ. स. ६२२ साली महंमद मक्केहून मदिनेला पळून गेला आणि तेथपासून मुसल-मानांच्या कालगणनेला सुरुवात झाली. ह्या कालगणनेला हिजरी सन म्हणतात.

महंमदाच्या पलायनाच्या ह्या दिवसाला मुसलमान लोक फार मानतात. इ. स. ६३२ साली महंमद पैगंबरवासी झाला.

इस्लाम धर्माची पाच मुख्य तत्त्वे आहेत. (१) कलेमा, (२) नमाज, (३) रोजा, (४) जकात, व (५) हज्ज.

कलेमा म्हणजे ईश्वर एक आहे हे तत्त्व.



दिवसातून पाच वेळा – पहाटे, मध्यान्ही, दोन प्रहरी, सायंकाळी व रात्री – अल्लाची प्रार्थना करणे यास 'नमाज' म्हणतात. नमाज पढतेवेळी हात-पाय धुऊन मक्केकडे तोंड करून बसावयाचे असते.

तिसरे तत्त्व 'रोजा' – आत्मशुद्धीसाठी मुसलमान लोक ह्या तत्त्वानुसार वर्षातून एकदा तरी उपवास करतात. रमजान महिन्यात ते कसोशीने हे तत्त्व पाळतात.

गोरगरिबांच्या मदतीसाठी उत्पन्नाचा १/४० हिस्सा कर म्हणून द्यावा असे इस्लाम धर्मात सांगितले आहे. ह्याला 'जकात' म्हणतात.

आणि 'हज्ज' म्हणजे प्रतिवर्षी मक्केची यात्रा करणे.

इस्लामी धर्माची तत्त्वे चांगली आहेत. स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, दया, क्षमा, शांती ह्यांवर त्या धर्माची स्थापना झाली आहे.

**सण**

मोहरम, इद-ए-मिलाद, बकरी ईद वगैरे सण मुसलमान लोक साजरे करतात. त्यांपैकी इद-ए-मिलाद हा सण विशेष महत्त्वाचा आहे. या दिवशी महंमदाची जयंती आणि पुण्यतिथी ह्या दोन्ही येतात. त्यामुळे ह्या सणाला दुहेरी महत्त्व आले आहे. ह्या दिवशी सुंदर पोषाख करून मुसलमान लोक मशिदीत एकत्र जमून नमाज पढतात. एकमेकाला स्नेहभराने आलिंगन देऊन 'ईद मुबारक'– ही ईद तुला सुखाची जावो–असे म्हणतात.

मोहरम हा मुसलमानांचा गाजलेला सण. त्याच्या मागे पुढील इतिहास आहे. महंमदाच्या मृत्यूनंतर पैगंबराच्या गादीवर कोणी बसावे असा वाद झाला. महंमदाच्या मुलीचे हसन व हुसेन हे दोन मुलगे होते. थोरला हसन आजोबाच्या गादीवर खलीफा म्हणून अधिष्ठित झाला होता. पण शेजारच्या देशाच्या राजाचा ह्या गादीवर डोळा होता. आपापसांत लढाई नको म्हणून सुस्वभावी हसनने गादी सोडण्याचे ठरविले. मात्र शत्रूने– त्याचे नाव मयाविया–आपल्या परिवाराला त्रास देता कामा नये अशी हसनने अट घातली, पण मयावियाने ही अट तर पाळली नाहीच. उलट

विषप्रयोग करून हसनला मारले. पुढे मयाविया मरण पावला. आणि त्याने आपल्या मुलाला गादीवर बसविले. लोकांची इच्छा होती की, सदाचारी हुसेनला गादी मिळावी. त्याप्रमाणे त्यांनी हुसेनला आपल्या हद्दीत येण्यास सुचविले. हुसेन आपल्या परिवारासह यायला निघाला. हे कळताच मयावियाचा मुलगा यजिद ह्याने आपले सैन्य पाठविले. ह्या सैन्याने हुसेनला व त्याच्या मंडळीना वेढा दिला. तहानेने ही माणसे व्याकुळ झाली होती. शेवटी त्यांनी यजिदच्या सैन्याला थोडे मागे हटविले आणि नदीकडे जाण्याची वाट मोकळी केली. हुसेन पाणी पिण्यासाठी नदीकडे धावला; पण तेवढयात शत्रूच्या सेनापतीने त्याचा वध केला.

ह्या घटनेची आठवण म्हणून मोहरमच्या दिवशी मुसलमान लोक हुसेनची कागदी कबर करतात. ह्या कबरींना डोले किंवा ताबूत म्हणतात. हे ताबूत मिरवीत नेऊन नदीत थंडे करतात.

हुसेनला खलिफा मानणाऱ्या पंथाला शिया असे नाव तेव्हापासून पडले. दुसऱ्या पंथाला सुन्नी म्हणतात.

बकरी ईद हा सण एका देवभक्त माणसाचे स्मारक म्हणून फार पूर्वीपासून साजरा केला जातो. त्या देवभक्त माणसाचे नाव आब्राहाम. त्याला दोन मुलगे होते. त्यांतला धाकटा इस्माइल त्याचा विशेष आवडता होता. ते पाहून सैतानाने एक दिवस ईश्वराला म्हटले की, "तुझा हा भक्त पुत्रभक्त आहे! तुझ्यापेक्षा त्याचे आपल्या मुलावर अधिक प्रेम आहे." तेव्हा, आब्राहामची परीक्षा पहाण्यासाठी देव त्याच्या स्वप्नात आला आणि त्याला कुरबानी करायला सांगितले. आपल्याला सर्वांत प्रिय असलेल्या वस्तूचा त्याग करणे हा कुरबानीचा कायदा आहे. आब्राहामने

लाडक्या बकऱ्याची कुरबानी केली. पण पुन: तेच स्वप्न !" मग आब्राहामने देवाला विचारले, "तुला कोणाची कुरबानी पाहिजे ?" देवाने सांगितले, "तुझ्या लाडक्या मुलाची."

दुसऱ्या दिवशी आब्राहाम इस्माइलसह कुरबानीच्या जागी गेला. इस्माइलची आईही बरोबर होती. आब्राहामने मुलाच्या मानेवर सुऱ्याचा नेम धरला. तेवढ्यात ईश्वराने त्याला थांबवले आणि बकऱ्याची कुरबानी केली. अशा रीतीने हे कुटुंब देव-भक्तीच्या परीक्षेत पास झाले.

ह्या इस्माइलच्या वंशातच महंमद पैगंबर याचा जन्म झाला. आणि आब्राहाम इस्माइल ह्या बापलेकांच्या स्मरणार्थ बकरी ईद ऊर्फ बक्र ईद हा सण साजरा केला जातो. आपली प्रिय वस्तू देवाला अर्पण करण्यास मन तयार केले पाहिजे अशी शिकवण हा सण देतो.

असा आहे इस्लामी धर्म.

## शीख धर्म

शीख धर्माचा संस्थापक गुरू नानक याचा जन्म इ. स. १४६९ साली झाला. ते हिंदू–क्षत्रिय होते. त्यांच्या मते परमेश्वर एकच आहे. पण धर्माच्या नावाखाली लोक नाना चुका करीत आहेत. गुरू नानकाच्या मनावर कबीर आणि संत नामदेव ह्या दोघांच्या शिकवणीचा परिणाम झाला होता.


हिंदू–मुसलमानांचे ऐक्य व्हावे म्हणून ते स्वत: हिंदू पद्धतीची केशरी बंडी घालीत, आणि मुसलमानी थाटाची कलंदर टोपी वापरीत. अनेक हिंदू, मुसलमान त्यांचे शिष्य झाले होते.

### खालसा विधी

शीख धर्मात प्रवेश मिळविण्यासाठी करण्यात येणारा हा विधी. गुरू नानकानंतर बरेच धर्मगुरू झाले. त्यांतला एक गुरू-गोविंदसिग ह्याने पाच ककाराची ही दीक्षा काढली. (१) केस–

(जटा), (२) किरपान–( हत्यार ), (३) कच्छ–( काचा ), (४) कडे–(लोखंडी बांगडी), आणि (५) कंगवा (फणी), हे ते पाच ककार.

मुळात शांत आणि ईश्वरभक्त असलेला शीख धर्म हळूहळू लढाऊ बनला. औरंगजेबाने त्यांच्या एका गुरूचा क्रूरपणे वध केल्यापासून गुरू गोविंदसिंगाने हे धोरण स्वीकारले.



**ग्रंथसाहेब**

शिखांच्या धर्मग्रंथाचे नाव आहे हे. अमृतसरला असलेल्या शीखांच्या सुप्रसिद्ध सुवर्णमंदिरात तो ठेवलेला असतो. शीख धर्मात हिंदू व इस्लामी ह्या दोन धर्मांचे ऐक्य आढळते. शिखांनी

मुसलमानांसारखी दाढी आणि हिंदूंसारख्या जटा राखल्या, एवढेच नव्हेतर हिंदूंच्या मुंजीसारखा 'पाहील' ह्या नावाचा संस्कार-सुद्धा त्यांनी स्वीकारला. शीख धर्म हा हिंदू–मुसलमानांना जोडणारा दुवा आहे. आणि तो हिंदू धर्माचाच एक पंथ म्हणून समजला गेला आहे. नुकत्याच पाकिस्तानशी झालेल्या लढाईत शिखांनी मोठा पराक्रम गाजविला आहे. हिंदू धर्माबद्दल आणि हिंदू लोकांबद्दल त्यांना ओढ वाटते हे त्यामुळे सिद्ध होते.

भारतातील अन्य धर्म हे असे आहेत. त्या सर्वांचा अभ्यास केला तर प्रत्येक धर्माचे इतर धर्मांशी साम्य आहे हे दिसून येईल. प्रत्येक धर्मातले चांगले आपण उचलावे, आणि आपला धर्म अधिक चांगला करावा.

## स्वाध्याय

१. अधिकमास केव्हा येतो ? त्याला आणखी कोणकोणती नावे आहेत ?

२. द्रौपदीच्या पूर्वजन्माची हकीगत थोडक्यात सांगा.

३. कदर्य ब्राह्मणाला वानराचा जन्म का आला व त्याचे काय झाले?

४. पुरुषोत्तम व्रताविषयी तुम्हास काय माहिती मिळाली?

५. पुढील व्यक्तींविषयी थोडक्यात माहिती सांगा.

(अ) झरतुष्ट्र, (आ) येशू, (इ) महंमद पैगंबर, (ई) गुरू नानक.

६. भारतातील इतर धर्म कोणते? त्यांचे संस्थापक कोण? त्यांचे धर्मग्रंथ कोणते?

७. ख्रिस्ती शक, पारशी शक, हिजरी शक, विक्रम शक आणि शालिवाहन शक यांतील सर्वांत जुना शक कोणता ?

८. टिपा लिहा:—खालसा विधी, पाच ककार, मोहरम, नवजोत, नाताळ, नमाज.